RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक ४८] मंगळवार, जून ३०, २०२६/आषाढ ९, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ८४**

**प्राधिकृत प्रकाशन**

### कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक कडोंमपा/नरवि/६३१६ .— ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली शहराच्या सेक्टर क्र. ३ ते ७ ची विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे.) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस / १२०८ / २८८४ / प्र.क्र.१३९ / ०९ / नवि-१२, दिनांक ४ एप्रिल, २०१२ अन्वये भागशः मंजूर झाली असून ती दिनांक ०१/०६/२०१२ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्रमांक टिपीएस-१२१२ / ४५८ / प्र.क्र. १४८/१२/ नवि-१२, दिनांक ४ जुलै, २०१६ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक ०४/०८/२०१६ पासून अंमलात आली आहे. (यापुढे जिचा एकत्रित उल्लेख " उक्त मंजूर विकास योजना" असा करण्यात आला आहे.)

आणि ज्याअर्थी उक्त मंजूर विकास योजनेच्या सेक्टर क्र. ४ मधील मौजे - काटेमानिवली येथील स.नं. ११० / अ(पै.) मध्ये आ.क्र. ४६७ 'फेरीवाल्यांसाठी जागा' एकूण क्षेत्र ५२००.०० चौ.मी. आणि आ.क्र.४६८ 'पोलीस चौकी' एकूण क्षेत्र ३३००.०० चौ.मी. याकरीता आरक्षित आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त आरक्षण" असा करण्यात आला आहे.)

आणि ज्याअर्थी, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ - ३), कल्याण यांनी उक्त आरक्षणामध्ये नव्याने पोलीस ठाणा इमारत, पोलिस अधिकारी / अमलदार यांचेकरीता शासकीय निवास स्थाने व परेड ग्राऊंड हे बांधकाम करण्यासाठी आवश्यक शासनाची मंजुरी घेतल्याचे कळविले आहे. तसेच उक्त आरक्षणापैकी आ.क्र. ४६८ 'पोलीस चौकी' या आरक्षणामध्ये विद्यमान पोलीस चौकी असून सदर भुखंडामध्ये नव्याने पोलीस ठाणा इमारत, पोलीस अधिकारी/अमलदार यांचेकरीता शासकीय निवास स्थाने व परेड ग्राऊंड बनविणेसाठी विद्यमान जागा अपुरी असल्याने आ.क्र. ४६७ 'फेरीवाल्यांसाठी जागा' हे आरक्षण रद्द करण्यासाठी विनंती अर्ज केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणापैकी आ.क्र. ४६७ ‘फेरीवाल्यांसाठी जागा’ मधील एकूण आरक्षित क्षेत्रापैकी ३०२५.०० चौ.मी. क्षेत्र आणि आ.क्र.४६८ ‘पोलीस चौकी’ मधील एकूण आरक्षित क्षेत्रापैकी २७७५.०० चौ.मी. अशा एकत्रित ५८००.०० चौ.मी. क्षेत्रामध्ये उक्त आरक्षणा मधून वगळून आ.क्र.४६८अ ‘पोलीस ठाणे व वसाहत’ असे नामभिधान करणेकरीता उक्त अधिनियमातील कलम ३७ (१) अन्वये उक्त विकास योजनेमध्ये फेरबदल करणेकरिता कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (यापुढे जिचा उल्लेख ‘उक्त महानगरपालिका’ असा करण्यात आला आहे.) आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकीय ठराव क्र. ३५९, दि. १२/१२/२०२५ अन्वये वैधानिक कार्यवाही करणेसाठी मंजुरी दिली आहे.

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा खालील ठिकाणी कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

(१) सहाय्यक संचालक नगररचना, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण (प.).

(२) ‘४ / जे’ प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कोळसेवाडी, कल्याण (पू.).

उक्त फेरबदल प्रस्तावास ज्या नागरीकांना हरकत व सूचना असतील त्यांनी विहीत स्वरुपात त्यांचे म्हणणे ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसांचे आत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सचिव कार्यालयामध्ये सादर करण्यात याव्या. जेणेकरून, सदर फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजुरीस सादर करण्यापूर्वी त्यावर विचार करण्यात येईल.

**सं. ना. डोईफोडे,**

कल्याण,
दिनांक ३० एप्रिल २०२६.

सहाय्यक संचालक नगररचना,
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

## KALYAN-DOMBIVALI MUNICIPAL CORPORATION, KALYAN

### Notice

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

Whereas, the Development Plan for Sector No. 3 to 7 of Kalyan-Dombivali Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Development Plan") has been partly sanctioned by the government in Urban Development Department under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No.TPS-1208/2884/C.R.139/09/UD-12, dated 4th April, 2012 and has came into force with been sanctioned by the Government in Urban Development Department under section 31(1) of the said Act, vide Notification No.TPS-1212/458/C.R.148/12/UD-12, dated 4th July, 2016 and has came into force with effect from 04/08/2016. (hereinafter jointly referred to as "the said Sanctioned Development Plan").

And Whereas, In the said Sanctioned Development Plan of sector 4, Land Bearing Survey No. 110/A(Pt.) of village :- Katemanivali, area admeasuring 5200.00 Sq.Mtr. is reserved for site no.467 'Hawkers Zone' and area admeasuring 3300.00 Sq.Mtr. is reserved for site no. 468 'Police Chowky' (hereinafter referred to as "the said Development Plan Proposal").

And Whereas, Deputy Commissioner of Police, Zone 3, Kalyan has informed Kalyan-Dombivali Municipal Corporation. (hereinafter referred to as "the said Corporation") that they have obtained requisite permission from the State Government to construct Police Station, Residential Quarters and Parade Ground for Police Officers/Employees on plot bearing R. No. 468 "Police Chowky". Since the available land is insufficient to carry out the above development, they have requested the said Corporation to de-reserved R. No. 467 "Hawkers Zone" of the said land.

And Whereas, the above said Development Plan Proposal, it is to be de-reserved an area admeasuring 3025.00 Sq.Mtr. from R. No. 467 "Hawkers Zone" and de-reserved an area admeasuring 2275.00 Sq.Mtr. out of R. No. 468 "Police Chowky", admeasuring total area of 5800.00 Sq.Mtr. and it is to be redesignated as Res. No. 468A "Police Chowky And Quarters" (hereinafter referred to as "the said Proposed Modification") and the Commissioner and Administrator of the said Corporation has approved via General Body Resolution No. 359, dated 12/12/2025 to carry out the neccessary changes in the said Sanctioned Development Plan as per Sec 37(1) of the said Act.

The part plan showing the details of the said Proposed Modification is kept open for Inspection for the public on all working days at following offices.

(1) Assitant Director of Town Planning, Kalyan-Dombivali Municipal Corporation, Kalyan (W.).

(2) 4/J Ward Office, Kalyan-Dombivali Municipal Corporation, Kolsewadi, Kalyan (E.).

Now therefore, all citizens are hereby informed, suggestion/objection if any to the said Proposed Modification should be communicated in writting to the office of Secretary, Kalyan-Dombivali Municipal Corporation within 30 (Thirty) Days from the date of publication of this notice in the *Gazette of Government of Maharashtra*, so that the suggestion/objection which would be received can be taken into consideration before submitting the said Modification Proposal to State Government for further action.

S. N. DOIFODE,

Kalyan,
dated 30th April 2026.

Assistant Director of Town Planning,
Kalyan-Dombivali Municipal Corporation, Kalyan.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.